**महाराष्ट्र शासन**

आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे कार्यालय,
जुने जकात घर,दुसरा माळा,शहीद भगतसिंग मार्ग,मुंबई-४०००२३,
E-MAIL:exciseho@vsni.net Fax No.022 2662370 Tel.No.Jt.Comm.022 22620238

विषय : शुध्द/अतिशुध्द मद्यार्काची परराज्यात निर्यात करतांना घ्यावयाच्या दक्षतेबाबत.

---

**वाचा-१**) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डिएनएस ११२००१/५७६८८/११,दिनांक ०९-०८-२००१.
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डिवायएस ११२००५/मद्यार्क निर्यात/चार,दिनांक २०-०६-२००५.
३) या कार्यालयाचे शुध्दीपत्रक क्र. डिवायएस ११२००५/मद्यार्क निर्यात/चार,दिनांक ०७-०७-२००५.
४) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डिवायएस ११२००५/मद्यार्क निर्यात/चार,दिनांक ०८-०८-२००६.
५) या कार्यालयाचे शुध्दीपत्रक क्र. डिवायएस ११२००५/मद्यार्क निर्यात/चार,दिनांक १२-१२-२००६.

## परिपत्रक

क्रमांक : डिवायएस ११२००५/मद्यार्क निर्यात/चार मुंबई, दिनांक १३ एप्रिल,२०१०.

१. या कार्यालयाच्या वर नमुद केलेल्या परिपत्रक /शुध्दीपत्रकांन्वये पेय मद्यासाठी मद्यार्काची (RS/ENA) परराज्यात निर्यात करण्याबाबतचे निर्देश व अधिकार निर्गमित करण्यात आले आहेत.उपरोक्त अनु.क्र.५ मधील शुध्दीपत्रकान्वये पेय मद्यासाठी मद्यार्काची २०,००,००० (वीस लाख) ब.लि.पर्यंत परराज्यात निर्यात करण्यासाठी, परवानगी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना बहाल करण्यात आले आहेत व मासिक २०,००,००० (वीस लाख) ब.लि.पेक्षा जास्त मद्यार्काची परराज्यात निर्यात करावयाची असल्यास,आयुक्तांची परवानगी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.मात्र या कार्यालयाकडे काही घटकांनी जिल्हाधिकाऱ्यांची मर्यादा वाढविण्याची विनंती केली आहे.२०,००,००० (वीस लाख) ब.लि.पेक्षा जास्त मद्यार्काची (RS/ENA) निर्यात करावयाची असल्यास त्यांना त्याकरीता बऱ्याच अडचणींना तोंड दयावे लागते.असे घटकांचे म्हणणे आहे.सदर बाब विचारात घेऊन पेय मद्यासाठी मद्यार्काची (RS/ENA) परराज्यात निर्यात करावयाची असल्यास, अशा घटकांना मासिक ५०,००,०००(पन्नास लाख) ब.लि.पर्यंत परवानगी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात येत आहे.मात्र ५०,००,०००(पन्नास लाख) बि.लि. पेक्षा जास्त निर्यात करावयाची असल्यास अशा घटकांना मद्यार्काची निर्यात करण्यापुर्वी आयुक्तालयाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

२. याबाबत अधिक स्पष्ट करण्यात येते की,या कार्यालयाचे संदर्भीय परिपत्रक क्र.१,२ व ४ मधील इतर सर्व सूचना व संदर्भीय क्रमांक ३ येथील शुध्दीपत्रक दिनांक ०७/०७/२००५मधील परिच्छेद १ मधील सूचना पूर्वीप्रमाणेच कायम राहतील. गोवा, दमण व मध्यप्रदेश या राज्यातील सर्व निर्यातीस आयुक्तालयाची पूर्व परवानगी घेणे पूर्वी प्रमाणेच बंधनकारक राहील.

३. तसेच सर्व अधीक्षकांना पुढे असेही सूचीत करण्यात येते की, मद्यार्क निर्यातीबाबतची माहिती या कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध असणे आवश्यक असल्यामुळे, ज्या घटकांना त्यांच्या स्तरावर निर्यातीसाठी वरीलप्रमाणे परवानगी देण्यात येईल, त्या पत्राची एक प्रत न चुकता या कार्यालयास सादर करावी. या कार्यालयास सदर पत्राची प्रत पाठविण्याची जबाबदारी अधीक्षकांची राहील.

४. सदर परिपत्रकाची पोच द्यावी.

स्वाक्षरी/-
(इकबाल सिंग चहल)
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१. सर्व जिल्हाधिकारी यांना सस्नेह.
२. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.